# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०२/०६/२०१८**

## १) खुन :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक १८.०५.२०१८ रोजी चे १६.३० वा. चे सुमारास स्मशानभुमी जवळ वाजेगांव ता. जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन ग्राम पंचायतचे राजकारणाचे वैयमनश्यातुन यातील **मयत नामे शेख अल्लावल्ली महेबुबसाब, वय ४२ वर्षे व्यवसाय कार्यकर्ता/ मजुरी रा. वाळकी (बु) ता. लोहा जि. नांदेड** यास जिवे ठार मारले. वगैरे मा. कोर्टाचे आदेशावरुन यातील **फिर्यादी मालनबी भ्र. महेबुबसाब शेख, वय ६५ वर्षे व्यवसाय सरपंच, रा. वाळकी (बु) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं २१३/२०१८ कलम ३०२, ३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि /एस. के. माने मो.क्र. ०२४६२-२३६३७३** हे करीत आहेत.

## २) खुनाचा प्रयत्न :-

**नांदेड ग्रामीण** :- दिनांक ३१.०५.२०१८ रोजी चे २०.३० वा. चे सुमारास फिर्यादीचे घरासमोरील ओटयावर विणकर वसाहत दुध डेअरी जवळ धनेगांव नांदेड येथे यातील जखमी फिर्यादीस आरोपीने तु माझ्या भावास मी दारु पिवुन गल्लीतील लोकांना शिवीगाळ करतो असे का सांगितले म्हणुन त्याचे हातातील लाकडाने मारहाण करु लागला त्यावेळी फिर्यादीने लाकडी बांबु धरला असता आरोपीने फिर्यादीस खंजरने डाव्या बाजुच्या बरगडीच्या खाली वार करुन गंभीर जखमी केले व जिवे मारण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी मारोती रुकमाजी कोमलवार वय ५२ वर्षे व्यवसाय मजुरी रा. विणकर वसाहत दुध डेअरी जवळ धनेगांव नांदेड.**यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं २१२/२०१८ कलम ३०७, ५०४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/ शिवले मो.क्र. ७०२०२५०३८५** हे करीत आहेत.

## ३) मो.सा.चोरी :-

**अ)नांदेड ग्रामीण :-** दिनांक २६.०५.२०१८ रोजी चे १०.३० ते २२.०० वा. चे दरम्यान, लातुर फाटा स्कवेर टी साईड पार्कीग नांदेड येथे फिर्यादीने त्याची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/ए.पी.-२४०९ जुनी वापरती अंदाजे किंमत २५,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी भागवत गणेश पवार, वय २८ वर्षे व्यवसाय सेल्समन, रा. काकांडी, ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं २१०/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६३० देशमुख, मो.क्रं. ०२४६२-२३६३७३** हे करीत आहेत.

**ब) विमानतळ :-** दिनांक २७.०५.२०१८ रोजी चे १२.३० ते १५.०० वा. चे दरम्यान, केशवेनगर नांदेड येथे फिर्यादीने त्याची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/डब्ल्यु.-४२०९ जुनी वापरती अंदाजे किंमत २५,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी व्यंकट पि. शिवाजी उपवाड वय २६ वर्षे व्यवसाय नौकरी रा. मंगलसांगवी ता. कंधार ह. मु. जंगमवाडी नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १२९/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/८३२ काळे, मो.क्रं. ९९२३७९५७६०** हे करीत आहेत.

**क) किनवट :-** दिनांक ०१.०५.२०१८ रोजी चे ११.३० ते १६.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घरासमोरुन एस. व्ही. एम. कॉलनी किनवट जि. नांदेड येथे फिर्यादीने त्याची हिरो होंडा कंपणीची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/ए.एम.-५३३५ अंदाजे किंमत ३०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी द्वारकादास विठ्ठलराव वायाळ वय ५२ वर्षे व्यवसाय नौकरी रा. एस. व्ही. एम. कॉलनी किनवट** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. किनवट** गुरनं ११०/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/गवई , मो.क्रं. ९४२३५१०१९३** हे करीत आहेत.

# ४) चोरी :-

**माहुर :-** दिनांक ०१.०६.२०१८ चे १५.०० ते १५.३० वा. चे दरम्यान, माहुर बसस्थानक ते गुंज दरम्यान जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी व त्यांची पत्नी माहुर ते शेगांव बस गाडीने प्रवास करीत असतांना पर्स मध्ये ठेवलेले २०,०००/-रुपये व ०५ तोळे सोन्याचे हार किंमती १,१०,०००/- रुपयाचा असा एकुण १,३०,०००/- रुपयाचा मुद्येमाल माल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय नारायण सोनटक्के वय ७४ वर्षे व्यवसाय शेती रा. वाईबाजार ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. माहुर** गुरनं ५३/२०१८ कलम ३७९, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/जे. जी. मेश्राम , मो.क्रं. ९६७०७७२६४७** हे करीत आहेत.

# ५) कल्याण नावाचा मटका जुगार :-

**अ)हदगांव :-** दिनांक ०१.०६.२०१८ रोजी चे १८.३५ वा. चे सुमारास, तामसा टी. पॉईट जवळ ए. वन. बिर्यानी हॉटेल चे बाजुस हदगांव जि. नांदेड यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह २,२०० /- रुपयासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/ ८४५ संतोष बालु राठोड पो. स्टे. हदगांव** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. हदगांव** गुरन. १०३/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/जाधव मो.नं. ९४२३७५११११५** हे करीत आहेत.

**ब)हदगांव :-** दिनांक ०१.०६.२०१८ रोजी चे १८.०० वा. चे सुमारास, नवीन बसस्थानक हदगांव जि. नांदेड यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ४,३०० /- रुपयासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/८३६ गणपत धनसिंग चव्हाण, पो. स्टे. हदगांव** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. हदगांव** गुरन. १०२/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/जाधव मो.नं. ९४२३७५११११५** हे करीत आहेत.

# ६) गळफास घेवुन अकस्मात मृत्यु :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०१.०६.२०१८ रोजी चे २०.३० वा. चे सुमारास, मयताचे शेतातील चिंचाचे झाडाला खुपसरवाडी शिवार ता. जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे कोंडीबा पि. बळीराम मंदावाड, वय २८ वर्षे व्यवसाय वयोवृध्द रा. खुपसरवाडी ता. जि..नांदेड** हा नमुद ठिकाणी दारु पिऊन दारुच्या नशेत साडीचे कपडयाने चिंचेच्या झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार बळीराम पि. कोंडीबा मंदावाड, वय ९६ वर्षे व्यवसाय वयोवृध्द, रा. खुपसरवाडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** आ.मृ. ५०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६३० देशमुख , मो.क्र. ०२४६२-२३६३७३** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**


**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०२/०६/२०१८**

दिनांक ०१.०६.२०१८ पासुन मा. पोलीस अधिक्षक साहेब, नांदेड यांनी नांदेड शहरात प्रत्येक आठवडयाच्या **दर सोमवारी "नो हॉर्न डे"** म्हणुन घोषीत केले आहे. तरी नांदेड शहरातील सर्व वाहन धारकांना दुचाकी स्वार, चारचाकी वाहन चालक, ॲटो चालक, तसेच ट्रॅव्हल्स चालक मालक, एस. टी. चालक, ट्रक चालक व मालक, तसेच मालवाहु टेंम्पो यांना अवाहन करण्यात येते की, एअर हॉर्न च्या वापरामुळे प्रदुषणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी सर्व जनतेनी मा. पोलीस अधीक्षक साहेब, यांच्या अवाहनास प्रतिसाद देवुन सहकार्य करावे. असे शहर वाहतुक शाखा, नांदेडच्या वतीने सर्व वाहन धारकांना विनंती करण्यात येत आहे.

**(गणेश माणिकराव सोंडारे)**
पोलीस निरीक्षक,
शहर वाहतुक शाखा, नांदेड